# विजेत्या ठरलेल्या होम मिनिस्टर्सना व्हर्लपूल कंपनीतर्फे खास बक्षीसे

कोल्हापूर (प्रतिनिधी): महिला वर्गात लोकप्रिय असलेल्या झी मराठी वाहिनी वरील 'होम मिनिस्टर' या मालिकेच्या चतुर्थ शतकी (४०० व्या) भागाच्या विजेत्या ठरलेल्या इचलकरंजीच्या सौ. सुनिता कदम यांना प्रख्यात व्हर्लपूल कंपनीच्या वतीने वॉशिंग मशिन व फ्रिज अशी दुहेरी बक्षीसे देण्यात आली. उपविजेत्या कोल्हापूरच्या सौ. रेखा कुबेर व सौ. मनिषा ढिकले यांना प्रत्येकी फ्रिज बक्षीस देण्यात आला.



झी मराठी वाहिनीवरील होम मिनिस्टर विजेत्या सौ. सुनिता कदम यांना व्हर्लपूल कंपनीचे वॉशिंग मशिन व फ्रिज यांचे बक्षीस देताना विवेक, मध्यभागी आदेश बांदेकर, डावीकडे फ्रिजच्या बक्षीसाच्या मानकरी सौ. रेखा कुबरे आणि उजवीकडे सौ. मनिषा ढेकले दिसत आहेत.

आदेश बांधेकर यांच्या हसत-खेळत, खुमासदार निवेदन शैलीने तमाम महिला वर्गामध्ये लोकप्रियता मिळवलेल्या 'होम मिनिस्टर' या गेम शोचा ४०० वा भाग खास कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये जिल्ह्यातील ४०० महिलांना सहभागी होण्याची संधी देण्यात आली होती. सहभागी महिला नटून-थटून, मोठ्या उत्साहाने सामान्य ज्ञानाच्या या स्पर्धेमध्ये सामील झाल्या होत्या. त्यामुळे या गेम शोची रंगत अधिकच वाढली.

वॉशिंग मशिन, फ्रिज उत्पादनामध्ये आघाडीवर असलेल्या व्हर्लपूल या नामांकित कंपनीने होम मिनिस्टरच्या ४०० व्या भागाचे निमित्ताने विजेत्या महिलेस वॉशिंग मशिन व फ्रिज आणि दोन उपविजेत्या महिलांना प्रत्येकी फ्रिज अशी बक्षीसे जाहीर केली होती. या बक्षीसांचे वितरण कंपनीचे विवेक यांच्या हस्ते व निवेदक आदेश बांदेकर यांच्या उपस्थितीत विजेत्या महिलांना करण्यात आले. या बक्षिसांबद्दल विजेत्या महिलांनी विशेष आनंद व्यक्त केला.